# नीरी येथे व्याख्यान

—Lokmat Marathi-15-04-24




सीएसआईआर-राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान (सीएसआईआर-नीरी) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बीएसएनएल, नागपूर व महाराष्ट्र दूरसंचार परिमंडळाचे प्रधान महाप्रबंधक यश पान्हेकर यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. जातीभेदाच्या प्रचंड आव्हानांचा सामना करून त्यांनी महान देश घडविण्यात यश प्राप्त केले. विशिष्ट उद्देश ठेवून शिक्षण घेतलेल्या बाबासाहेबांनी केलेल्या कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली. वंचित वर्ग, कामगार व महिलांच्या अधिकारांना त्यांनी प्राधान्य दिले. शिवाय क्लाउड कम्प्युटिंगशी संबंधित आव्हाने, डाटा कॉपी करणे, डाटा मिररिंग आणि डाटा सुरक्षेबाबतही डॉ. आंबेडकर यांनी इशारा दिल्याची माहिती पान्हेकर यांनी नमूद केली. यावेळी नीरीचे संचालक डॉ. अतुल वैद्य व मुख्य वैज्ञानिक डॉ. एम. पी. पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. शारदा कोसनकर यांनी संचालन केले.